(3) (७)

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या शुक्रवार दिनांक २९ जानेवारी १९९३ रोजी संपन्न झालेल्या ३ ऱ्या बैठकीचा स्थायी करण्यांत आलेला कार्यवृत्तांत.

Confirmed on 24.2.93 [illegible]

(८३)

शुक्रवार दिनांक २९ जानेवारी १९९३ रोजी झालेल्या मुंबई घरदुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या ३ -या बैठकीचा कार्यवृत्तांत.

शुक्रवार दिनांक २९ जानेवारी १९९३ रोजी सकाळी ११.३० वाजता मुंबई घर दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ तिसरी बैठक गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील सभागृहात संपन्न झाली. या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १] डॉ. शंकर वामन मटकर | सभापती |
| २] श्री.पी.एस.भोगल | उपसभापती तथा मुख्य अधिकारी |
| ३] श्रीयुत पोतदार उपमुख्य अभियंता | मुख्य अभियंता/मुंबई महानगर पालिका यांचे प्रतिनिधी. |
| ४] श्री. रॉकी क्रिस्टो | सदस्य |
| ५] श्री. कमलाकर शर्मा | सदस्य |
| ६] श्री. विवेक भर्तू | सदस्य |
| ७] मोहम्मद फारुख मन्सुरी | सदस्य |
| ८] श्री. चेतन शहा | सदस्य |
| ९] श्री.व्ही.बी.वरस्कर | सदस्य |
| १०] श्री.शंकरराव पिटला | सदस्य |
| ११] श्री.महम्मद अझम खान | सदस्य |
| १२] श्री.गजेंद्र लष्करी | सदस्य |
| १३] श्री.श्रीकांत पाटील | सदस्य |
| १४] श्री. काजरोळकर सहाय्यक करनिर्धारक व संकलक, मुंबई महानगरपालिका. | विशेष निमंत्रित |

माननीय सदस्य श्री.हेमराज शहा यांनी सदर बैठकीस उपस्थित राहू शकणार नाही असे माननीय सभापती यांना आगाऊ कळविले आहे.

माननीय सभापती डॉ.शंकर वामन मटकर, यांचे अध्यक्षतेखाली बैठकीस प्रारंभ झाला. सचिवांनी माननीय सभापती, सदस्य व अधिका-यांचे स्वागत केले.

..२..

सभेचे कामकाज सुरु होण्यापूर्वी मुंबई शहरात नुकत्याच झालेल्या दंगलीत बळी पडलेल्या नागरीकांना श्रध्दांजली अर्पीत करावी अशी सुचना माननीय सदस्य श्री. [illegible] लष्करी यांनी केली. ही सुचना सर्वांनी मान्य केली व सर्व उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित केली व पुढील प्रमाणे ठराव एकमताने संमत केला.

ठराव क्र. ३-७ :

एकमताने ठराव करण्यांत येतो की, मुंबईमध्ये झालेल्या दंगलीमधील मृतांच्या कुटुंबियांच्या दुखात मुंबई घर दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई सहभागी आहे व सर्व दंगलग्रस्तांचे पुनर्वसन तत्परतेने व्हावे या दृष्टीने मंडळामार्फे प्रयत्यांनी पराकाष्ठा केली जाईल.

त्यानंतर सभेच्या नियमित कामास सुरुवात झाली.

बाब क्र. ३-१

विषय:-दिनांक २८.१२.९२ रोजी झालेल्या मुंबई दु. व पु. मंडळाच्या दुसऱ्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

या विषयावर सविस्तर चर्चा झाली मा. सदस्यांनी पुढील प्रमाणे सुचना केल्या.

१] श्री. चेतन शहा –

पु.क्र. १३ – उपकरप्राप्त इमारतीमधील रहिवाश्यांची सहकारी संस्था स्थापन करण्यांच्या प्रस्तावासोबत कोणते कागदपत्र व दस्तऐवज सादर करणें आवश्यक आहे याची सविस्तर यादी रहिवाश्यांना पुरविण्यांत यावी तसेच ही यादी दिल्यानंतरही अपूर्ण स्वरुपातील प्रस्ताव संबंधित सहकारी संस्थेस परत पाठवावेत असे आमच्या बैठकीत ठरले होते. या बाबीचा कार्यवृत्तांत उल्लेख नसल्याची तक्रार श्री. चेतन शहा यांनी केली सविस्तर चर्चेअंती या सुचनेची नोंद कार्यवृत्तांतात करावी असे ठरले.

बाब क्र. २-५

पु.क्र. –१९

प्राधिकरण अधिनियम ८९[३] ऐवजी ८८ [३] असा उल्लेख असावयास हवा होता अशी सुचना माननीय सदस्य श्री. विवेक भर्तू यांनी केली. सविस्तर चर्चेअंती सदर सुचना

पृ.क्र.-१९ - मान्य झाली व त्यानुसार कार्यवृत्तांतात दुरुस्ती करावी असे ठरले.

पृ.क्र.-२१ -

पहिल्या ओळीमधील सुचना मा. सदस्य श्री. कमलाकर शर्मा यांनी केली असा उल्लेख असणे आवश्यक होते अशी सुचना श्री. कमलाकर शर्मा यांनी केली. सविस्तर चर्चेअंती ही सुचना मान्य करण्यात आली व कार्यवृत्तांतात आवश्यक ती सुधारणा करण्याचे ठरले.

पृ.क्र.२९ -

मा. सदस्य श्री. शंकरराव पिटला यांची सुचना केली की, निविदा स्विकृती संबंधी अधिकार प्रधान करण्याविषयीचा प्राधिकरणाचा ठराव क्रमांक १४८५ दि. १३.११.८७ ची प्रत सदस्यांना उपलब्ध व्हावी. सविस्तर चर्चेअंती ठरले की सदर ठरावाची प्रत पुढील बैठकीत सर्व सदस्यांना उपलब्ध करुन दयावी.

उपमुख्य अभियंता [उत्तर] यांनी सुचना केली की, पृ.क्र.३५ वरील अनुक्रमांक ३८ मध्ये १३५ च्या ऐवजी १३७ अशी दुरुस्ती करावी ही सुचना मान्य झाली.

सविस्तर चर्चेअंती वर उल्लेख केल्याप्रमाणे दुरुस्त्या व सुधारणांसह मुंबई दु. व पु. मंडळाच्या दि. २८.१२.९२ व २९.१२.९२ रोजी झालेल्या दुसऱ्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्यात आला.

बाब क्र.३-२:-

विषय:-अनुपालन अहवाल.

पृ.क्र. ४३-

मुंबई मधील सर्व संक्रमण शिबिरातील गाळ्यांची दिनांक ३ जानेवारी १९९३ रोजी मंडळाच्या अभियंत्या मार्फत एकाच वेळी तपासणी करण्यात आली होती. या तपासणीचा अहवाल विशेष कार्य अधिकारी श्री. जग्यासी यांनी सादर केला. या विषयावर पुढील प्रमाणे चर्चा झाली.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी सांगितले की, अहवालात दिलेल्या माहितीनुसार संक्रमण शिबिरात सुमारे ८४६८ गाळ्यात अधिकृत भाडेकरु राहतात तर त्याहुन अधिक गाळे अनाधिकृत रहिवाश्यांनी व्यापलेले आहेत ही अतिशय

चिंतेची बाब आहे. सर्व अनधिकृत व्यक्तींना बाहेर काढण्याची तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे असे ही त्यांनी सांगितले. मा. सदस्य श्री. व्ही. बी. वरस्कर यांनी सांगितले की, संक्रमण शिबिरातील गाळे मंडळातील संबंधीत कर्मचा-यांच्या सहकार्यानेच अनधिकृत व्यक्तींनी ताब्यात घेतलेले आहेत अनेक दलाल उघडपणे कर्मचा-यांच्या सहकार्याने हे व्यवहार करीत आहेत त्यामुळे सर्व अनधिकृत घुसखोरांकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे असा आरोप त्यांनी केला. मा. सदस्य श्री. फारुख मन्सुरी यांनी सांगितले की, अनधिकृतपणे व्यापलेल्या गाळयांची यादी त्यांनी यापूर्वीच अधिका-यांकडे सादर करुन त्यासंदर्भात कार्यवाही करण्याची सुचना संबंधीतांना केलेली होती. परंतु या संदर्भात कोणतीही कार्यवाही झालेली नाही. श्री. रॉकी क्रिस्टो यांनी प्रश्न विचारला की हे दलाल कसे काय निर्माण झाले आहेत? अनेक दलालांचे मंडळाच्या कर्मचा-यांशी संगनमत आहेत व त्यांना न्यायालयात जाण्याविषयी आगाऊ सल्ला कर्मचा-यां-कडूनच दिला जातो असा आरोप त्यांनी केला. मा. सदस्य श्री. आजम खान यांनी असे प्रतिपादन केले की, अनधिकृत घुसखोराविरुध्द ठोस कार्यवाही न झाल्यास संक्रमण शिबिरातील सर्वच गाळे अनधिकृत घुसखोर बळकावतील व जुन्या इमारतीत रहाणा-या रहिवाश्यांना संक्रमण शिबिरातील गाळे उपलब्ध होऊ शकणार नाही अशी भिंती त्यांनी व्यक्त केली. श्री. गजेंद्र लष्करी यांनी सांगितले की, ओशिवरा येथील बहुसंख्य गाळे अनधिकृत व्यक्तींनी बळकावल्यामुळे त्या ठिकाणी दंगलग्रस्तांचे पुनर्वसन करतांना मोठी तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. मा. सभापतींना घेराव घालून दंगलग्रस्तांच्या पुनर्रवसनाचा कार्यक्रम उधळून लावण्याचा प्रयत्न दलालांनी व त्यांच्या सह सहका-यांनी केला होता. अशाही परिस्थितीत मंडळाच्या अधिका-यांनी स्वत:चा जीव धोक्यात घालून दंगलग्रस्तांना निवारा उपलब्ध करुन देण्यांच्या कामी महत्वपूर्ण कामगिरी बजावली आहे. ही अत्यंत कौतुकाची गोष्ट आहे असे त्यांनी सांगितले श्री. शंकरराव पिटला यांनी विचारणा केली की, भाडेवसुलीकार या घुसखोरी संबंधीचा अहवाल वरिष्ठांना का सादर करीत नाहीत?

विशेष कार्य अधिकारी श्री.जग्याशी यांनी खुलासा केला की, संक्रमण शिबिरातील ब-याच गाळ्यांमध्ये अनधिकृत व्यक्ती गेली अनेक वर्षे रहात असल्यामुळे त्यांची संख्या तुलनेनें मोठी आहे त्यामुळे त्यांचे वर कार्यवाही करण्यांच्या संदर्भात अनेक अडचणी उपलब्ध होतात. या व्यक्तीविरुध्द कार्यवाही करण्यांसाठी पुरेसा पोलीस बंदोबस्त उपलब्ध होऊ शकत नाही, तर अनेक प्रकरणी न्यायालयातून स्थगिती आदेश आणले गेले जातात. या घुसखोरांविरुध्द प्रभावीपणे कार्यवाही करण्यासाठी मंडळाकडे स्वतंत्र कक्ष असावा व त्यांत पुरेसे पोलीस कर्मचारी कायमचे उपलब्ध व्हावेत असा प्रस्ताव यापूर्वीच मंडळाकडे सादर केल्याची त्यांनी सांगितले. श्री.जग्याशी, विशेष कार्य अधिकारी यांनी असेही प्रतिपादन केले की संक्रमण शिबिरासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्यामुळे प्रत्येक भाडेवसुलीकाराकडे एकाहून अधिक संक्रमण शिबिरे सोपविलेली आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून फक्त भाडेवसुलीचेच काम केले जाते. त्यांच्याकडे भाड्यापोटी बरीच मोठी रक्कम जमा होत असल्याने त्यांना भाडेवसुली कार्यालय सोडून जाणे शक्य होत नाही. संक्रमण शिबिरातील रखवालदाराविषयी श्री.जग्याशी यांनी अशी माहिती दिली की, संक्रमण शिबिराच्या राखणीसाठी दोन वेगवेगळया एजंन्सींना कंत्राटी पध्दतीने कामे सोपविलेली आहेत. त्यामुळे या एजंन्सीकडून संक्रमण शिबिरात पहारेकरी ठेवले जातात. सर्व सदस्यांनी असे मत व्यक्त केले की या खाजगी संस्था संक्रमण शिबिराच्या देखरेखीचे काम योग्य प्रकारे करु शकत नाहीत. या खाजगी ठेकेदारांकडून रखवालदारांना अत्यंत अल्प मोबदला देण्यांत येतो. त्यामुळे हे रखवालदार योग्य प्रकारे काम करु शकत नाही. सर्व सदस्यांनी विचारणा केली की या खाजगी संस्थावर कोणाचे नियंत्रण आहे व येवढया मोठया प्रमाणात घुसखोरी होऊनही या रखवालदारांनी संबंधीत अधिका-यांकडे तक्रार का केली नाही? या खाजगी संस्थाची कंत्राटे रद्द करुन मंडळाने प्रत्येक संक्रमण शिबिरात स्वतःचे पहारेकरी नेमल्यास काम अधिक प्रभावीपणें होऊ शकेल असे मत सदस्यांनी व्यक्त केले. संक्रमण शिबिरातील अनिधकृत व्यवहार करणा-या दलालांच्या विरुध्द "टाडा" कायद्याखाली कार्यवाही करावी अशी सूचना सदस्यांनी केली. सविस्तर चर्चेअंती मा.सभापतींनी सुचना केली की सध्या मंडळाने कंत्राटी पध्दतीवर नियुक्त केलेले रखवालदार कोणते काम ..६.

करतात तसेच संक्रमण शिबिरांची सुरक्षा यंत्रणा प्रभावीपणे कार्यान्वीत करण्याचे दृष्टीने कोणती उपाययोजना करावी या संबंधीचा सविस्तर अहवाल विशेष कार्य अधिकारी यांनी पुढील बैठकीत सादर करावा.

पृ.क्र.४५ :

मागिल बैठकीत दिलेल्या आदेशानुसार भाडेपट्टया-वरील इमारतीचे संपादन व हस्तांतरण म्हाडा अधिनियमातील तरतूदीनुसार करणे शक्य आहे काय विषयी विधी सल्लागार प्राधिकरण यांचेकडून पत्र क्र.२२ दि.१९.१.९३ अन्वये अहवाल प्राप्त झाला असून प्राधिकरण अधिनियम नियमातील तरतूदी नुसार भाडेपट्टयावरील उपकर-प्राप्त इमारतीनु जमिनीचे संपादन व हस्तांतरण करता येते व उच्च न्यायालय तसेच सर्वोच्च न्यायालयाने म्हाडा अधिनियमातील ही तरतूद वैध ठरविलेली आहे अशी माहिती विधी सल्लागार प्राधिकरण यांनी दिल्याचे कार्यकारी अभियंता सहकारी गृहनिर्माण कक्ष यांनी सभागृहास सांगितले. सविस्तर चर्चेअंती मागील बैठकीत प्रलंबित ठेवलेल्या लक्ष्मी निकेतन माटुंगा मुंबई १९ या इमारती-मधील रहिवाश्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी इमारत व त्याखालील जमिन संपादित करण्यांचा प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यांत आला.

ठराव क्र. ३-८

लक्ष्मीनिकेतन या नांवाने ओळखल्या जाणा-या माटुंगा मुंबई- १९ येथील भूखंड व त्यावरील इमारत नियोजित लक्ष्मी-निकेतन सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी संपादीत करण्याच्या प्रस्तावास एक मताने मंजूरी देण्यांत आली.

पृष्ठ क्र. ४७

विषय:-इमारतीच्या बांधकाम क्षेत्रफळामध्ये येणा-या फरकाबाबत.

या विषयावर मागील बैठकीत झालेल्या आदेशानुसार इमारतीच्या बांधकाम क्षेत्रफळाच्या फरकाविषयी सविस्तर अहवाल उपमुख्य अभियंता [दक्षिण] यांनी सादर केला. या विषयावर सविस्तर चर्चा झाली. मा.सदस्य श्री.शंकरराव पिटला यांनी असे सांगितले की, मुख्य अभियंता/मुंबई मंडळ यांनी दिलेल्या

आदेशानुसार सध्याचे टप्प्याचे क्षेत्रफळ पूर्वीच्या टप्प्यापेक्षा कमी असून हा फरक ५ टक्क्यापेक्षा जास्त झाल्यास पूर्वीच्या वास्तुशास्त्रज्ञास तीन वर्षासाठी मंडळाच्या यादीवरून कमी करण्यांत येते त्याचप्रमाणे सध्याचे क्षेत्रफळ पूर्वीच्या क्षेत्रफळापेक्षा ५ टक्क्याहून जास्त झाल्यास पूर्वीच्या वास्तुशास्त्रज्ञावर कारवाई का करण्यांत येवू नये. सविस्तर चर्चा होऊन सध्याचे क्षेत्रफळ पूर्वीच्या क्षेत्रफळापेक्षा कमी अथवा जास्त झाल्यास व फरक ५ टक्क्याहून अधिक झाल्यास पूर्वीच्या वास्तुशास्त्रज्ञास तीन वर्षासाठी मंडळाच्या यादीवरून कमी करण्याची कारवाई करावी, असे ठरले. त्यांनुसार संबंधीत वास्तुशास्त्रज्ञावर आवश्यक ती कारवाई करून त्या विषयीचा अहवाल मंडळापुढे सादर करण्यांत यावा अशी सूचना संबंधीत अधिकाऱ्यांना देण्यांत आली. यानंतर परिशिष्ट ["अ" मध्ये दर्शविलेल्या 39 इमारतीच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकांना मंजूरी देण्यांत आली.

ठराव क्रमांक :३.९ :

उत्तर व दक्षिण परिमंडळामध्ये परिशिष्ठ "अ" मध्ये दर्शविलेल्या एकूण ३९ इमारतीच्या दुरुस्तीचे नकाशे व अंदाजपत्रके यांना संबंधित वास्तुशास्त्रज्ञांवर कारवाई केल्या-नंतर मान्यता देण्यांत यावी असा निर्णय झाला.

पृष्ठ क्रमांक:५५

विषय : उपसभापती व मा. सदस्य, मुंबई घर दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी संक्रमण शिबिरास दिलेल्या भेटीचा अहवाल.

यासंबंधीचा अहवाल उपमुख्य अभियंता [उत्तर] यांनी सादर करून सविस्तर माहिती दिली. याविषयावर सविस्तर चर्चा झाली. मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी, यांनी सांगितले की, संक्रमण शिबिराच्या दुरुस्तीसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून द्यावा व संक्रमण शिबिरे रहाण्यायोग्य करण्यांत यावी. त्यांनी अशीही सूचना केली की, रहाण्यायोग्य नसलेल्या संक्रमण शिबिरातील इमारती तोडून त्या जागेवर बहुमजली इमारती बांधण्यांत याव्यात. मा. सदस्य श्री. फारुख मन्सुरी

यांनी असे निदर्शनास आणून दिले की, संक्रमण शिबिरातील गाळ्याचे दरवाजे, खिडक्या, विद्युत उपकरणे मोठ्या प्रमाणात चोरीला गेली आहेत. या संदर्भात कोणास जबाबदार धरुन कारवाई करण्यांत येणार आहे, असा त्यांनी प्रश्न विचारला. मा.सदस्य श्री. शंकरराव पिटला यांनी असे निदर्शनास आणून दिले की, गोरेगांव येथील संक्रमण शिबिरातील मोकळ्या जागेवर अनेक अनधिकृत स्टॉल उभे राहिले आहेत. त्या संदर्भात काय कारवाई करण्यांत आली असा प्रश्न त्यांनी विचारला. त्यावर विशेष कार्यकारी अधिकारी श्री. जयस्वाली यांनी असा खुलासा केला की, अत्यंत अपुरा कर्मचारी वर्ग असल्यामुळे त्या संदर्भात कोणतीही ठोस उपाययोजना करणे शक्य होत नाही. मा.सदस्य श्री. कमलाकर शर्मा यांनी अशी सूचना केली की, संक्रमण शिबिरातील मोकळ्या जागेवर मंडळातर्फे स्टॉल बांधून ते भाडेपट्टयावर वितरीत केल्यास संक्रमण शिबिरात अनधिकृत अतिक्रमणे होणार नाहीत, यावर उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांनी असा खुलासा केला की, मुंबई मंडळाच्या ताब्यात असून वास्तुशास्त्रज्ञ/मुंबई मंडळ यांनी संक्रमण शिबिरातील मोकळ्या जागेचा कोणत्या प्रकारे विनियोग करता येईल याविषयी प्राथमिक सर्वेक्षण सुरु केले आहे. सविस्तर चर्चेअंती असे ठरले की, मा.सदस्यांनी केलेल्या सुचना लक्षात घेऊन संक्रमण शिबिरातील गाळे रहाण्यायोग्य करण्याच्या दृष्टीने संक्रमण शिबिराची आवश्यक ती दुरुस्ती तसेच साफसफाई करण्यांत यावी. रहाण्यायोग्य नसलेल्या संक्रमण शिबिरातील जुन्या इमारती पाडून त्या जागेवर बहूमजली इमारती बांधण्यां विषयीचा प्रस्ताव उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांनी सादर करावा असे ठरले.

पृष्ठ क्रमांक –६३

विषय : दुरुस्ती उपकराच्या थकित बाकी बाबत महानगरपालिकेकडे पाठपुरावा करण्यां बाबत.

दुरुस्ती उपकराच्या थकित वसुलीच्या संदर्भात केलेल्या कारवाईची माहिती उपमुख्य अभियंता [द/उ.] यांनी सादर केली. या संदर्भात श्री. काजरोळकर सहाय्यक कर निर्धारक व संकलक, मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक ५ जानेवारी १९९३ रोजी महापालिका आयुक्त व शासनाचे वरिष्ठ अधिकारी यांची संयुक्त बैठक झाली असल्या विषयीची माहिती सभासदांना दिली व या थकबाकीच्या वसुलीच्या संदर्भात मुंबई महानगरपालिकेतर्फे योग्य ती कारवाई करण्यांत येत आहे असे त्यांनी सांगितले. श्री. गजेन्द्र लष्करी, यांनी अशी सुचना केली की, मा. सदस्य श्री. रॉकी क्रिस्टो यांनी नगरसेवक या नात्याने मुंबई महानगरपालिकेमधील संबंधीत वरिष्ठ अधिका-यांकडे पाठपुरावा करुन दुरुस्ती उपकराची थकबाकी प्रभावीपणे वसुल करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करावी.

पृष्ठ क्रमांक : ३.१०

मागील बैठकीत काही इमारतींची मा. सदस्यांनी संयुक्त पहाणी करुन अहवाल सादर करावा असा निर्णय झाला होता त्याप्रमाणे एकूण १२ इमारतींची विविध सदस्यांनी पहाणी करुन अहवाल सादर केलेला आहे. अ.क्र. ६ वरील २४, नबीबुल्ला स्ट्रीट, सी१/२ विभाग या इमारतीची मा. सदस्य श्री. चेतन शहा यांनी दिनांक ६.१.९३ रोजी पहाणी केली आहे. त्यांनी अशी सूचना केली की, ही इमारत दुरुस्त करण्याऐवजी भाडेकरुंनी स्वत: पुनर्बांधणी करावी. यावर सविस्तर चर्चा होऊन उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांनी या इमारतीची पुनर्बांधणी करणे शक्य आहे का या विषयीचा अहवाल सादर करावा, अ.क्र.९ वरील १९२-२०२ डॉ. भडकमकर मार्ग, डी२ विभाग ह्या इमारतीची मा. सदस्य श्री. फारुख मन्सुरी यांनी दिनांक ४.१.१९९३ रोजी संयुक्त पहाणी केली, त्यांनी असा अहवाल सादर केला की, इमारतीच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक प्रमाणित मर्यादेपेक्षा अधिक असल्याने भाडेकरुंनी त्यांच्या हिश्याची रक्कम दिनांक १५.१.१९९३ पूर्वी भरण्यांत यावी. दिनांक

..

१५. १. १९९३ पूर्वी भाडेकरूंनी खर्चाची अतिरिक्त रक्कम जमा न केल्याने हे अंदाजपत्रक प्रलंबित ठेवावे असे ठरले. सर्वश्री हेमराज शहा, गजेन्द्र लष्करी, श्रीकांत पाटील, व्ही. बी. वरतक, शंकरराव गिरला, कमलाकर शर्मा, विवेक भरतू, रॉकी क्रिस्टो, आझम खान, यांनी इमारतीची पहाणी करुन इमारतीच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकांना मान्यता देण्यास हरकत नाही असा अहवाल दिलेला आहे. त्यामुळे परिशिष्ठ "क" मध्ये दर्शविलेल्या १० इमारतीचे दुरुस्तीचे अंदाजपत्रकांना मंजूरी देण्यांत आली.

ठराव क्रमांक: ३. १०.

परिशिष्ठ "क"मध्ये दर्शविलेल्या १० इमारतींच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकांना मंजूरी देण्यांत आली एक मताने निर्णय झाला.

पृष्ठ क्रमांक: १०३

मागील बैठकीत मंजूरीसाठी सादर केलेल्या सर्व सुधारीत अंदाजपत्रकांची सविस्तर छाननी मुख्य अभियंता/ प्रा, मुंबई यांनी करुन बैठकीस सादर करावी असे ठरले होते. मुख्य अभियंता यांचेवतीने उपमुख्य अभियंता [मुख्यालय] यांनी अंदाजपत्रकाची सविस्तर छाननी करुन अहवाल सादर केला आहे. सविस्तर चर्चेअंती पुढील दोन अंदाजपत्रके आवश्यक त्या सुधारणा करुन पुढील बैठकीत सादर करावीत असे ठरले.

[१] १४-२२ पाकमोडीया स्ट्रीट, सी१-२ विभाग,

[२] डॉ. आत्माराम मर्चंट रोड, सी३-४ विभाग,

उर्वरीत इमारतीच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकांना मंजूरी देण्यांत आली.

ठराव क्रमांक: ३. ११

परिशिष्ठ "ड" मध्ये दर्शविलेल्या एकूण २१ इमारतीच्या दुरुस्तीच्या सुधारीत अंदाजपत्रकास मंजूरी देण्यांत आली.

ठराव क्रमांक: . ३. ३. १.

विषय : ६, महालक्ष्मी सदन या नावाने ओळखल्या जाणाऱ्या संत पॉल स्ट्रीट नायगाव, मुंबई-१४ येथील भूखंड व त्यावरील इमारतीसह नियोजित महालक्ष्मी सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी संपादीत करण्याचा प्रस्ताव.

सविस्तर चर्चेअंती प्रस्ताव मंजूर झाला व पुढील प्रमाणे ठराव एक मताने मंजूर झाला.

ठराव क्रमांक: ३. १२

६, महालक्ष्मी सदन सेंट पॉल स्ट्रीट, नायगांव, मुंबई-१४ येथील भुखंड व इमारत नियोजित महालक्ष्मी सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी संपादित करण्याच्या प्रस्तावास एक मताने मंजूरी देण्यांत आली.

बाब क्रमांक: २. ३. २

विषय : श्रीनिवास या नावाने ओळखल्या जाणाऱ्या ३२९-३३५ सरदार वल्लभभाई पटेल रोड, डी विभाग मुंबई येथील भूखंड व त्यावरील इमारतीचे नियोजित श्रीनिवासी गृहनिर्माण संस्थेकरिता संपादन करण्याचा प्रस्ताव.

सविस्तर चर्चेअंती सदरहू प्रस्ताव मंजूर झाला.

ठराव क्रमांक: ३. १३

श्रीनिवास या नावाने ओळखल्या जाणाऱ्या ३२९-३३५ सरदार वल्लभभाई रोड, डी विभाग मुंबई येथील भूखंड व त्यावरील इमारतीचे नियोजित श्रीनिवास सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता संपादन करण्याच्या प्रस्तावास एकमताने मंजूरी देण्यांत आली.

बाब क्रमांक: ३. ३. ३

विषय : ३०-३४ व्होरा बिल्डींग या नावाने ओळखल्या जाणा-या ३०-३४ दिका स्ट्रीट, सी विभाग मुंबई येथील भूखंड त्यावरील इमारतीसह नियोजित गोकुळधाम सहकारी गृहनिर्माण संस्थेचा भूसंपादन करण्याचा प्रस्ताव.

सविस्तर चर्चेअंती हा प्रस्ताव मंजूर करण्यांत आला.

ठराव क्रमांक: ३.१४

३०-३४ व्होरा बिल्डींग, दिका स्ट्रीट "सी" विभाग मुंबई येथील भूखंड व मालमत्ता नियोजित गोकूळधाम सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी संपादीत करण्याच्या प्रस्तावास एक मताने मंजूरी देण्यांत आली.

बाब क्रमांक ३.३.४

विषय : अहमद मॅन्शन या नावाने ओळखल्या जाणा-या १२ आर्थर बंदर रोड, कुलाबा मुंबई येथील भूखंड त्यावरील इमारतीसह नियोजित अहमद मॅन्शन सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी संपादन करण्याबाबत प्रस्ताव.

सविस्तर चर्चेअंती सदरहू प्रस्तावास मंजूरी देण्यांत आली.

ठराव क्रमांक: ३.१५

अहमद मॅन्शन या नावाने ओळखल्या जाणा-या १२, आर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई येथील भूखंड व त्यावरील इमारतीसह नियोजित अहमद मॅन्शन सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी संपादन करण्यांच्या प्रस्तावास एकमताने मंजूरी देण्यांत आली.

बाब क्रमांक: ३.४

विषय : सन १९९२-९३ च्या सुधारीत अंदाजपत्रक व १९९३-९४ चे वार्षिक अंदाजपत्रकास मंजूरी देण्यांबाबत.

मंडळाचे मुख्य लेखाअधिकारी, श्री. टिल्लू यांनी अंदाजपत्रके बैठकीत सादर केली व अंदाजपत्रकातील तरतुदी विषयी सविस्तर माहिती सभागृहास दिली. सदस्यांनी असे मत व्यक्त केले की, १९९२-९३ च्या अंदाजपत्रकात तरतूद केल्याप्रमाणे अनधिकृत गाळेधारकां कडून उपलब्ध होणारा रुपये १० कोटींचा निधी तसेच गृहनिर्माण महाप्रकल्पाद्वारे उपलब्ध व्हावयाचा रुपये साडेआठ कोटींचा निधी अद्यापपर्यंत उपलब्ध न झाल्याने मंडळास दुरुस्ती कार्यक्रम कार्यान्वित करण्यांत अनेक अडचणी येत आहेत, त्यामुळे निधीची उपलब्धता निश्चित असेल तरच हा निधी अंदाजपत्रका मध्ये जमा म्हणून धरण्यांत यावा. श्री. गजेन्द्र लष्करी यांनी सांगितले की, पुनर्रचित इमारतीमधील अनधिकृत गाळे धारकांना नियमित करण्या विषयीच्या प्राधिकरणाच्या निर्णयाची भाडेकरुंना कल्पना नसल्यामुळे ही प्रकरणे मंडळापुढे मंजूरीसाठी येत नाहीत हा निधी जास्तीत जास्त प्रमाणात व उपलब्ध व्हावा. या साठी अनधिकृत गाळेधारकांना नियमित करण्याची माहिती वर्तमान पत्राद्वारे प्रसिध्द करावी. सन १९९३-९४ च्या अंदाज पत्रकात दंगलग्रस्ताच्या पुनर्वसनाच्या कार्यक्रमास प्राधान्य देण्यांत यावे अशीही सूचना करण्यांत आली. मा. सभापती, डॉ. श्री. शंकरराव मटकर यांनी अंदाजपत्रका तील तरतुदींची सविस्तर विवेचन केले. व अपेक्षित निधी उपलब्ध व्हावा यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे अशी विनंती केली. सविस्तर चर्चेअंती १९९२-९३ च्या सुधारीत अंदाजपत्रकास व सन १९९३-९४ च्या वार्षिक अंदाजपत्रकास एकमताने मान्यता दिली व अंदाजपत्रक प्राधिकरणास सादर करण्यांस अनुमती दर्शविली.

<u>ठराव क्रमांक ३.१६</u>

मुंबई घर दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या सन १९९२-९३ च्या सुधारीत अंदाजपत्रकास तसेच सन ९३-९४ या वार्षिक अंदाजपत्रकास सविस्तर चर्चेअंती एकमताने मान्यता देण्यांत आली व सदर अंदाजपत्रक प्राधिकरणास सादर करण्यांस अनुमती दर्शविली.

बाब क्रमांक: ३.५.१

विषय : दंगलीमध्ये नुकसान झालेल्या उपकरप्राप्त इमारती, संक्रमण शिबिरातील गाळे व पुनर्रचित इमारतीमधील गाळे यासंबंधीचा अहवाल.

उपमुख्य अभियंता [दक्षिण][उत्तर] व पुनर्रचना यांनी जानेवारी १९९३ मध्ये मुंबईत उदभवलेल्या दंगलीमध्ये हानी पोहोचलेल्या उपकरप्राप्त इमारती, संक्रमण शिबिरातील गाळे व पुनर्रचित इमारतीतील गाळे या विषयीचा अहवाल सभेपुढे सादर केला. याविषयावर सविस्तर चर्चा झाली. सदस्यांनी असे मत व्यक्त केले की, दंगलीमध्ये नुकसान झालेल्या इमारती व संक्रमण शिबिरातील गाळे यांची दुरुस्ती युध्द पातळीवरुन करणे आवश्यक आहे. मा. सदस्य श्री. चेतन शहा यांनी असे निदर्शनास आणून दिले की, दंगलीमध्ये हानी पोहोचलेल्या कोणत्याही इमारतीचे दुरुस्तीचे काम हाती घेण्यापूर्वी संबंधीत महापालिका अधिकाऱ्यांची परवानगी घेणे आवश्यक आहे असे परिपत्रक मुंबई महानगर पालिकेने काढलेले आहे. त्याचप्रमाणे या कामासाठी होणाऱ्या खर्चापोटी शासनाकडून अनुदान मिळणे आवश्यक आहे असेही मत सदस्यांनी व्यक्त केले. उपमुख्य अभियंता [उत्तर व दक्षिण ] यांनी असा खुलासा केला की, दंगलीमध्ये हानी पोहोचलेल्या इमारतीच्या दुरुस्तीचा प्रस्तावित खर्च प्रमाणित मर्यादा रुपये ७५०/- प्र. चौ. मी. यापेक्षा अधिक होण्याची शक्यता आहे. अंदाजपत्रक तयार केल्यानंतरच दुरुस्तीच्या निश्चित खर्चाचा आकडा मिळू शकेल. सदस्यांनी अशी सूचना केली की, दुरुस्तीचे काम हाती घेण्यापूर्वी संबंधित इमारतीला दंगलीमध्ये हानी पोहोचलेली आहे काय या विषयीची खात्री संबंधीत प्राधिकाऱ्याकडून करुन घेणे आवश्यक आहे. सविस्तर चर्चेअंती पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यांत आले.

[१] दंगलीमध्ये हानी पोहोचलेल्या उपकरपात्र इमारती, संक्रमण शिबिरातील गाळे व पुनर्रचित गाळे या विषयीचा सविस्तर अहवाल मुख्य अधिकारी/मुंबई दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी आजच शासनात सादर करावा व या कामाच्या दुरुस्तीसाठी व दंगलग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी अपेक्षित असणारा खर्च

शासनाने मंडळास अनुदान म्हणून द्यावा अशी शासनास विनंती करावी.

[२] दंगलीमध्ये हानी पोहोचलेल्या इमारतींच्या दुरुस्ती चे सविस्तर अंदाजपत्रके संबंधीत उपमुख्य अभियंता यांनी दिनांक २ फेब्रुवारी ९३ पर्यन्त तयार करावीत.

[३] दरम्यान या पुनर्वसन कामासाठी शासनाची मंजूरीही प्राप्त करुन घ्यावी.

[४] सादर केलेल्या यादीमधील इमारतीमधील गाळ्यांना दंगलीमध्येच हानी पोहोचली आहे काय याची खात्री करुन घ्यावी.

बाब क्रमांक:३. ५. २

विषय : इमारत क्र. १६ जी. ते के, नौशिर भरूचा मार्ग या इमारतीची पुनर्बांधणी योजना इमारत क्र. ८ च्या पायावरील बांधकामाची [सुपरस्ट्रक्चर] निविदा मंजूर करणेविषयी.

उपमुख्य अभियंता/ पुनर्रचना यांनी प्रतिपादन केले की, ही बाब मंडळाच्या मागील बैठकीत मंजूरीसाठी ठेवली होती, परंतू मा. सदस्यांच्या विनंतीनुसार गेल्या बैठकीत ही बाब प्रलंबित ठेवून या बैठकीत मंजूरीसाठी सादर केलेली आहे. निम्नतर ठेकेदारांनी निविदा स्वीकृतीची ग्राह्य कालमर्यादा दिनांक १० फेब्रुवारी १९९३ पर्यन्त वाढवून दिलेली आहे. तरी या निविदेस मंजूरी द्यावी अशी विनंती उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांनी सभागृहास केली. चर्चेअंती उपमुख्य अभियंता [पुनर्रचना]यांनी सादर केलेला निविदेचा प्रस्ताव मंजूर करण्यांत आला व पुढील प्रमाणे ठराव एकमताने संमत करण्यांत आला.

ठराव क्र. ३/१७

इमारत क्र. १६ जी. ते के. नौशीर भरूचा मार्ग डी विभाग या संयुक्त पुनर्बांधणी योजनेतील इमारत क्र. ८ च्या पायावरील बांधकामाची [सुपरस्ट्रक्चर ] मे. ताराचंद एन्टरप्राईझेस यांची रु. ६७, ६५, ६९०/-[रुपये सदुसष्ट लाख, पासष्ट हजार सहाशे नव्वद फक्त]एवढया रकमेची निम्नतम निविदा एकमताने स्विकृत करण्यांत आली.

बाब क्रमांक ३.५.३

मा. सदस्य श्री. गजेन्द्र लष्करी यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले की, दंगलीनंतर इमारतीच्या दुरूस्तीची बरोचशी कामे बंद पडलेली आहेत. ही कामे पुन्हा तातडीने सुरु करण्याची आवश्यकता आहे. सदस्यांनी असे मत व्यक्त केले की, सध्याच्या तणावाच्या परिस्थितीमध्ये ठेकेदार व त्यांचे कामगार कामाच्या जागी जाण्यास घाबरत आहेत. शिवाय दंगलीच्या काळामध्ये बरेचसे कामगार मुंबई बाहेर गेलेले आहेत. या विषयावर सविस्तर चर्चा झाली चर्चेअंती असे ठरले की, संबंधीत उपमुख्य अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी संबंधीत ठेकेदारांना तसेच दुरूस्तीची कामे चालू असलेल्या इमारतीमधील रहिवाश्यांच्या प्रतिनिधींना विश्वासात घेवून बंद असलेली दुरूस्तीचे कामे तातडीने सुरु करण्यांविषयी उपाययोजना करावी.

बाब क्रमांक: ३.५.४

सभापतींच्या परवानगीने मा. सदस्य श्री. चेतन शहा यांनी पुढीलप्रमाणे सूचना केली.

[१] दुरूस्ती खर्चाची प्रमाणित मर्यादा रुपये ५००/- प्र. चौ. मी. वरून रुपये ७५०/-प्र. चौ. मी. एवढी वाढविण्यांत आल्याने दुरूस्ती उपकराच्या तरतुदीत त्याप्रमाणे वाढ करण्यांत यावी.

[२] मोठ्या प्रमाणांत दुरूस्त केलेल्या इमारतींची पुन्हा पुन्हा दुरूस्ती करण्याऐवजी या इमारतीची पुनर्बांधणी करावी अशी सूचना केली.

[३] पुनर्रचित इमारतीमधील अनधिकृत गाळे धारकाकडून दंड म्हणून सध्या इमारतीच्या प्रत्यक्ष खर्चाएवढी रक्कम वसूल केली जाते. मुंबई शहरातील सध्याचे जागेचे बाजारभाव लक्षात घेवून दंडाची रक्कम दुप्पट करण्यांत यावी.

सचिव, दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ, यांनी मा. सभापती, मंडळाचे सर्व सदस्य, मुंबई महानगरपालिकेचे निमंत्रित अधिकारी व मंडळाचे अधिकारी यांचे आभार मानले व मा. सभापतींच्या संमतीने बैठकीचे काम संपविण्यांत आले.

सभापती
मुंबई दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.

परिशिष्ट "अ"

हाफव्यामध्ये फरक असलेल्या संबंधी वास्तुशास्त्रज्ञावर कार्यवाही केल्यानंतर मंजूरी दिलेली अंदाजपत्रके.

| अ.क्र. | पृष्ट | इमारत | विभाग |
|---|---|---|---|
| १. | ६७ | हाफीज मंजील, सेंट पॉल स्ट्रीट. | फग/द. |
| २. | ७३ | ३६-३८ लक्ष्मी बिल्डींग, जगन्नाथ भातनकर मार्ग | -"- |
| ३. | ८३ | ३४७ बी.दाणी चाळ, ना.म.जोशी मार्ग | -"- |
| ४. | ८७ | कोंडाजी चाळ नं.४, जेरबाई वाडीया रोड | -"- |
| ५. | ९१ | १०२ ओल्ड प्रभादेवी रोड | -"- |
| ६. | ९५ | ७२ बी.सयानी रोड | -"- |
| ७. | १०१ | ११४ एफ बाबासाहेब आंबेडकर मार्ग | ई-१ |
| ८. | १२७ | ४४ कामाठी पूरा ३ री गल्ली | ई-२ |
| ९. | ११७ | ६-६ नवरोजी हिल रोड | ब |
| १०. | १२९ | ५० बरंगटे सदन, गणेश गल्ली | फग/द |
| ११. | १३५ | ५०-६३, १० मौलाना आजाद रोड | इ-२ |
| १२. | १३७ | १०९ कामाठीपुरा दुसरी गल्ली | ई-२ |
| १३. | १३९ | ११०/७४ लक्ष्मी बिल्डींग | फग/द. |
| १४. | १४१ | १०४/१०८ काटावाला बिल्डींग | फग/उ. |
| १५. | १४३ | २१८ गुलखोजा चाळ | फ/द. |
| १६. | १४७ | २२ डी नवाब टँक रोड | इ-१ |
| १७. | १४९ | भागीरिथी भवन गणेश गल्ली | फ/द. |
| १८. | १८३ | ८९-९१ झकेरीया मस्जिद रोड | ब |
| १९. | १८७ | ५४-इ सुरभटजी राणा स्ट्रीट. | डी-२ |
| २०. | १९५ | १६५-१६७ नागदेवी स्ट्रीट | ब |
| २१. | २०१ | ६८- गुड हाऊस रोड | अ |
| २२. | २०७ | ११८-१२२ मसजीद स्ट्रीट | सी१-२ |
| २३. | २१९ | १५३ जंजीकर स्ट्रीट | ब |
| २४. | २२३ | ६ वाडीया स्ट्रीट | डी-२ |
| २५. | २२९ | ७-११ कोळसा स्ट्रीट | ब |
| २६. | २३३ | २८-२९ काविकर स्ट्रीट | ब |
| २७. | २३७ | ११४ सारंग स्ट्रीट | ब |
| २८. | २४७ | १० पहिला पारशीवाडा | डी-२ |
| २९. | २५९ | ५५-५७ बाबू गेणू रोड | सी३/४ |
| ३०. | २६१ | ३५८ जी., ज.शं.शेठ रोड | सी३/४ |
| ३१. | २६५ | २ जांभूळवाडी, ज.शं.शेठ रोड | सी३/४ |

परिशिष्ट " क "

मा. सदस्यांनी संयुक्त पहाणी केल्यानंतर मंजूरी दिलेले अंदाजपत्रके.

| अ.क्र. | पृ.क्र. | इमारतीचे नांव | विभाग |
|---|---|---|---|
| १. | २६९ | ६९ कामाठीपुरा, २री गल्ली. | ई-२ |
| २. | २७१ | १२८-१३० सारंग स्ट्रीट. | सी१-२ |
| ३. | २७५ | ९३ संतसेना महाराज मार्ग | सी१-२ |
| ४. | २७७ | ५४-५६ पहिली पठाण स्ट्रीट. | सी१-२ |
| ५. | २७९ | १७२-१७६ शेख मेमन स्ट्रीट. | सी३-४ |
| ६. | २८३ | २९, सदाशिव क्रॉस लेन | डी१ |
| ७. | २८५ | ३१२, फॉकलंड रोड | डी२ |
| ८. | २८७-अ | ४१-४५ सुतार चाळ | सी१-२ |
| ९. | २९३ | १९१ संतसेना महाराज मार्ग | सी१-२. |
| १०. | ३९१ | ९ बब्दुल रहेमान स्ट्रीट. | ब |

30

## परिशिष्ट "ड"

उप-मुख्य अभियंता [ मुख्यालय] यांनी छाननी केल्यानंतर मंजूरी दिलेल्या दुरुस्ती अंदाजपत्रकांची यादी.

| अनु. | पृ. क्र. | इमारत | विभाग |
| --- | --- | --- | --- |
| १. | ३०३ | ३५७ गणपतराव कदम मार्ग | फग/द. |
| २. | ३०७ | ७/१३ इस्माईल बिल्डींग वीर सावरकर मार्ग | -"- |
| ३. | ३११ | १५६ वाकोळ पुरन्दर मार्ग | -"- |
| ४. | ३१५ | २५ मसजीद स्ट्रीट | सी१/२ |
| ५. | ३१७अ | ७ मसजीद स्ट्रीट | -"- |
| ६. | ३१९ | २ हरिश्चंद्र कोरेगांवकर रोड | डी-१ |
| ७. | ३२३ | ८-१० नौशीर पेटीट स्ट्रीट | डी-२ |
| ८. | ३२९ | २०वी स्लेटर रोड | -"- |
| ९. | ३३३ | २३०-२३४ फॉकलंड रोड | -"- |
| १०. | ३३९ | 3 चुनाम लेन | -"- |
| ११. | ३४३ | ९ डॉ. भालेकर स्ट्रीट | -"- |
| १२. | ३४७ | १४ त्रिभुवन रोड | -"- |
| १३. | ३५३ | ६७०-६७० x नर. म. जोशी मार्ग | ई-२ |
| १४. | ३५७ | आगारवान बिल्डींग, मौलाना आजाद रोड | -"- |
| १५. | ३६१ | १८३अ रेखा कुटीर वीर सावरकर मार्ग | फग/द. |
| १६. | ३६५ | ३८१ ई काळबादेवी रोड | सी३/४ |
| १७. | ३७५ | २-८ सिंधी लेन | सी१/२ |
| १८. | ३७७ | १ मल्हारवाडी, कळबादेवी | सी३/४ |
| १९. | ३८५ | १८८ जी. वी. जे. मार्ग | डी-१ |
| २०. | ३८९ | ९-१५ दुसरी फकीर रोड | ब |
| २१. | ३२१क | ३५ फॉरजेट स्ट्रीट | डी-२ |

सभापती,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई.

सभापती
मुंबई दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.

सचिव
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना
मंडळ.